कलम ४ ( 1)(ख) ( iii)

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरयित्व निश्चित करुन कार्यपध्दतीबाबत तपशिल खालील प्रमाणे

नवीन भोसरी रुग्णालयतील प्रशासकीय कामकाजाच्या नस्ती लिपीकामार्फत तपासुन मा . आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सादर केले जातात . नवीन नवीन भोसरी रुग्णालय व त्यांच्या अंतर्गत ६ दवाखाने मार्फत कार्यक्षेत्रात येणा-या नागरिकांना वैद्यकीय सेवा पुरविणे , राष्ट्रीय आरोग्य कार्यकमांची अंमलबजावणीसाठी रुग्णालय व दवाखान्यामधील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांच्या अंतर्गत असणा-या कर्मचा-यांकडुन कामकाज केले जाते . रुग्णालयात तातडीक व प्रसुती विभागात केसपेपर काढुन तातडीक विभाग येथे वैद्यकीय अधिकारी कडुन रुग्ण तपासले जाते व गरजेनुसार उपचार / दाखल / संदर्भिय केले जातात . रुग्णालयाच्या ओ.पी.डी विभागा मध्ये आलेले रुग्ण ओ.पी.डी वेळेनुसार केसपेपर घेऊन गरजेनुसार संबंधीत विभागाचे वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन तपासणी करुन नवीन भोसरी रुग्णालयाच्या आय.पी.डी विभागामध्ये २४ तास रुग्णांचे गरजेनुसार उपचार दिले जातात . रुग्णालय व दवाखाने स्तरावरील कोणतीही अडचण आल्यास प्रशासकीय कामकाजाच्या नस्ती मुख्य कार्यालयाकडे सादर केली जाते . धन्वंतरी स्वास्थ योजना २०१३ धन्वंतरी स्वास्थ योजना विभागामार्फत पिंपरी चिंचवड मनपा आस्थपनेवरील कायम स्वरुपी कार्यरत असणा-या कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबीयांना ( पती , पत्नी २ आपत्य २५ वर्षा पर्यत ) वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात . तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांनाही या सुविधेचा लाभ दिला जातो .